0001

# नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचा :-** १) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, देवनार पोलिस स्टेशन, मुंबई यांचे दिनांक १०/०८/२०११ रोजीचे पत्र व त्यासोबतची कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र. ४५/२०११/जा.६७९, दि. २३/०८/२०११, दि.२९/०८/२०११ व दि.२२/०९/२०११

३) या कार्यालयाची "अंतरिम आदेश" क्र.निशि/अंमल/६-अ/ प्र.क्र.४५/२०११/जा.६८०, दिनांक २३/०८/२०११.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.४५/२०११/जा. ८५५
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई ४०० ०२०.

दिनांक :- २९/१०/२०११

## आदेश

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

बी.एम.सी. मैदानाजवळील रस्ता, पाटीलवाडी झोपडपट्टी, गोवंडी, मुंबई - ४३ येथे दिनांक ११/०६/२०११ रोजी रेशनिंगसाठीचा माल बाजारात विक्रीसाठी घेऊन जाणाऱ्या एका टेम्पोस पकडले असल्याने देवनार पोलिस स्टेशनचे अधिकारी यांनी ८:२५ वाजता पंचास सदर ठिकाणी बोलाविले.

उक्त ठिकाणी पोलिसांसमवेत सदरचे गुन्हयातील साक्षीदार पत्रकार श्री. अशोक वामनराव वैद्य उभे होते. सदर ठिकाणी आणखी एक इसम उभा असल्याचे दिसून आले. पोलिसांनी तो सदर टेम्पोचा चालक असल्याचे सांगितले. त्यास त्याचे नाव विचारले असता, त्याने त्याचे नाव मोहमद इम्रान मोहमद वजीर असे सांगितले. सदर टेम्पो आयशर कंपनीचा चॉकलेटी रंगाचा असून त्याचा क्र. एमएच-०४-डीडी-८७३६ असा असल्याचे दिसून आले. सदर टेम्पोवर निळ्या रंगाचे ताडपत्रीचे झाकण असून, पोलिस अधिकाऱ्यांनी व पंचानी टेम्पोची तपासणी केली असता, त्यामध्ये गव्हाच्या गोण्या असल्याचे आढळून आले.

सदर मालाबाबत टेम्पोचा चालक मोहमद इम्रान मोहमद वजीर याच्याकडे पोलिस अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष विचारणा केली असता, त्याने सदर मालाबाबत कोणतेही कागदपत्र व खरेदी बिले नसल्याचे सांगितले.

तद्नंतर सदर गव्हाने भरलेल्या टेम्पोबाबत पत्रकार श्री. अशोक वैध यांनी शिधावाटप अधिकारी, ४४ ई गोवंडी यांना भ्रमणध्वनीवरुन माहिती दिली व देवनार पोलिस स्टेशन या ठिकाणी हजर राहण्यास सांगितले. त्यावरुन शिधावाटप अधिकारी, ४४ ई गोवंडी हे त्याठिकाणी ११:३५ वाजता हजर झाले. त्यांनी सदर टेम्पो व मालाची पडताळणी केली असता, सदर टेम्पो चॉकलेटी रंगाच्या निळ्या ताडपत्रीने आच्छादला गेला असून त्यात शिधापत्रिकाधारकांना वितरीत करणाऱ्या गव्हाचे अंदाजे ऐंशी बाचके असल्याचे आढळले. याबाबत ट्रक चालक मोहमद इम्रान मोहमद वजीर याच्याकडे विचारणा केली असता, सदर साठा कुर्ला येथून भरुन ए.पी.एम.सी. येथे घेऊन जात असतांना उक्त ठिकाणी ट्रक पार्क करुन ठेवला. त्यांनतर पोलीसांनी चालकाचे मोबाईलवर फोनकरुन त्यास बोलावून घेतले. चालक तेथे आला असता, सदर टेम्पो संबंधित पत्रकाराने देवनार पोलिस स्टेशन समोर उभा केलेला आढळून आला असल्याचे सांगीतले. सदर ट्रकमधील मालाची पहाणी केली असता, शासकीय गोणी ऐवजी दुसऱ्या गोणीमध्ये गहू भरलेला आढळून आला.

अशाप्रकारे संबंधितानी संगणमत करुन सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत शिधापत्रिकेवर अनुदानित दराने वितरीत होणारा गहू गैरमार्गाने खरेदी विक्री करुन त्याची अनधिकृतपणे व बेकायदेशिररित्या स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी अवैधमार्गाने खुल्या बाजारात काळ्या बाजाराने वितरीत करण्यासाठी वाहतूक करीत असल्याचे सिध्द झाल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द (१) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८, ९ (२) दि बॉम्बे रेशनिंग एरिया शेडयुल कमोडिटीज (रेग्युलेशन ऑफ डिस्ट्रिब्युशन) ऑर्डर, १९८६ चे कलम ४, ५, ६, ७, ८ तसेच (३) दि महाराष्ट्र फुड ग्रेन्स रेशनिंग (सेकंड) ऑर्डर १९६६ चे कलम १८ (३) (अे अे अे) चा भंग केल्यावरुन संबंधितांविरुध्द देवनार पोलिस स्टेशन मुंबई येथे वि.स्था.ग्र.क्र. ४५/२०११ दि.११/०६/२०११ अन्वये गुन्हा नोंद करुन खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | आयशर कंपनीचा टेम्पो क्र. एमएच-०४-डीडी-८७३६ | १ नग | ६,००,०००/- |
| २ | टेम्पोमधील ८० बाचके गहू (प्रत्येकी ५० कि.ग्रॅ. वजनाचे) | ४००० किलो | ३२,०००/- |
| | | एकूण | ६,३२,०००/- |

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती वरिष्ठ पोलीस निरीक्षक, देवनार पोलीस स्टेशन यांनी वाचावे क्र. १ अन्वये केलेली असून, जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक ०६/०९/२०११ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली होती.

दिनांक ०६/०९/२०११ रोजीच्या सुनावणीस आरोपी/अपचारी तसेच तपासी पोलिस अधिकारी उपस्थित राहीले नाहीत. तथापी, सदरची सुनावणी प्रशासकीय कारणात्सव रद्द करण्यात आली व सदरची सुनावणी दिनांक १३/०९/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक १३/०९/२०११ रोजीच्या सुनावणीस आरोपी/अपचारी तसेच तपासी पोलिस अधिकारी यापैकी कोणीही उपस्थित राहीले नाहीत. सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे सादर करण्याची अंतिम संधी म्हणून पुढील सुनावणी दि.२०/०९/२०११ रोजी ठेवण्यात आली. सदरच्या सुनावणीस आरोपी/अपचारी तसेच तपासी पोलिस अधिकारी यापैकी कोणीही उपस्थित राहीले नाहीत. तथापी, सदरची सुनावणी प्रशासकीय कारणात्सव रद्द करण्यात येवून पुढील सुनावणी दि. ११/१०/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक ११/१०/२०११ रोजीच्या सुनावणीसही आरोपी/अपचारी तसेच तपासी पोलिस अधिकारी यापैकी कोणीही उपस्थित राहीले नाहीत.

सबब, प्रकरण गुणवत्तेच्या आधारे एकतर्फी निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES OFFICE BAI

## युक्तीवाद :-

प्रस्तूत प्रकरणी जप्त मुद्देमालाचे मालक, आरोपी तसेच अपचारी यांना त्याचप्रमाणे संबंधित तपासी पोलिस अधिकारी यांना त्यांचे म्हणणे सादर करण्याकरीता पुरेशी संधी देवून देखील ते सुनावणीस उपस्थित राहीले नाही.

## निष्कर्ष :-

प्रस्तुत प्रकरणी अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी देवनार पोलीस स्टेशन यांना दिनांक ११/०६/२०११ रोजी मिळालेल्या बातमीनुसार बी.एम.सी. मैदानाजवळील रस्ता, पाटीलवाडी झोपडपट्टी, गोवंडी, मुंबई - ४३ येथे पोहचले. त्याप्रमाणे दोन पंचास बोलावण्यात आले. उक्त ठिकाणी पोलिसांसमवेत सदरचे गुन्हयातील साक्षीदार पत्रकार श्री. अशोक वामनराव वैद्य उभे होते. सदर ठिकाणी आणखी एक इसम उभा असून तो सदर टेम्पो क्र. एमएच-०४-डीडी-८७३६ चा चालक असल्याचे सांगितले. त्यास त्याचे नाव विचारले असता, त्याने त्याचे नाव मोहमद इम्रान मोहमद वजीर असे सांगितले. सदर टेम्पोवर निळ्या रंगाचे ताडपत्रीचे झाकण असून, पोलिस अधिकाऱ्यांनी व पंचानी टेम्पोची तपासणी केली असता, त्यामध्ये गव्हाच्या गोण्या असल्याचे आढळून आले. सदर मालाबाबत टेम्पोचा चालक मोहमद इम्रान मोहमद वजीर याच्याकडे पोलिस अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष विचारणा केली असता, त्याने सदर मालाबाबत कोणतेही कागदपत्र व खरेदी बिले नसल्याचे सांगितले.

तद्नंतर सदर गव्हाने भरलेल्या टेम्पोबाबत पत्रकार श्री. अशोक वैध यांनी शिधावाटप अधिकारी, ४४ ई गोवंडी यांना भ्रमणध्वनीवरुन माहिती दिली व देवनार पोलिस स्टेशन या ठिकाणी हजर राहण्यास सांगितले. त्यावरुन शिधावाटप अधिकारी, ४४ ई गोवंडी हे त्याठिकाणी ११:३५ वाजता हजर झाले. त्यांनी सदर टेम्पो व मालाची पडताळणी केली असता, सदर टेम्पो चॉकलेटी रंगाच्या निळ्या ताडपत्रीने आच्छादला गेला असून त्यात शिधापत्रिकाधारकांना वितरीत करणाऱ्या गव्हाचे अंदाजे ऐंशी बाचके असल्याचे आढळले. याबाबत ट्रक चालक मोहमद इम्रान मोहमद वजीर याच्याकडे विचारणा केली असता, सदर साठा कुर्ला येथून भरुन ए.पी.एम.सी. येथे घेऊन जात असतांना उक्त ठिकाणी ट्रक पार्क करुन ठेवला. त्यांनतर पोलीसांनी चालकाचे मोबाईलवर फोनकरुन त्यास बोलावून घेतले. चालक तेथे आला असता, सदर टेम्पो संबंधित पत्रकाराने देवनार पोलिस स्टेशन समोर उभा केलेला आढळून आला असल्याचे सांगीतले. सदर ट्रकमधील मालाची पहाणी केली असता, शासकीय गोणी ऐवजी दुसऱ्या गोणीमध्ये गहू भरलेला आढळून आला. यावरुन सदर टेम्पो व त्यामधील गहू साठा जप्त करण्यात आला.

प्रस्तूत प्रकरणी जप्त मुद्देमालाचे मालक, आरोपी/अपचारी तसेच तपासी पोलिस अधिकारी यांना आपले म्हणणे सादर करण्याकरीता पुरेशी संधी देवून देखील ते सुनावणीस उपस्थित राहीले नाही. तसेच जप्त मुद्देमाल परत मिळण्याकरीता कोणीही दावा केलेला नाही. यावरुन आरोपी/अपचारी आणि जप्त मुद्देमालाचे मालक यांना याबाबत काहीही सांगावयाचे नसल्याचे आणि कोणताही खुलासा करावयाचा नसल्याचे तसेच जप्त मुद्देमाल परत मिळण्यासंदर्भात कसलेही स्वारस्य नसल्याचे व नोटीसीतील आरोप मान्य असल्याचे दिसून येते.

अशाप्रकारे सर्व संबंधितानी संगणमत करुन सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत शिधापत्रिकेवर अनुदानित दराने वितरीत होणारा गहू गैरमार्गाने खरेदी विक्री करुन त्याची अनधिकृतपणे व बेकायदेशिररित्या स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी अवैधमार्गाने खुल्या बाजारात काळ्या बाजाराने वितरीत करण्यासाठी वाहतूक करीत असल्याचे सकृत दर्शनी दिसून येते.

प्रस्तुत प्रकरणी जप्त मुद्देमालाची विल्हेवाट लावण्याचे आदेश देण्यापुरतेच सदरचे प्रकरण या कार्यालयाशी सीमित असून फौजदारी गुन्हा नोंद प्रकरणी संबंधित न्यायालयात योग्य तो निर्णय होईलच. सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला प्रदान करण्यात आलेल्या जिवनावशक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये देवनार पोलिस स्टेशन, मुंबई येथे वि.स्था गुन्हा नोंद क्र. ४५/२०११, दि. ११/०६/२०११ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात न्यायालयीन निर्णयाच्या अधीन राहून खालील आदेश देत आहे.

<u>आदेश</u> :-

१) या कार्यालयाचे दि. २३/०८/२०११ रोजीचे अंतरिम आदेश या आदेशान्वये कायम करण्यात येत आहे.

२) जप्त करण्यात आलेला टेम्पो क्र. एमएच-०४-डीडी-८७३६ हा शासनजमा करण्यात येत असुन, सदर टेम्पोची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी. तथापी, सदर टेम्पोचा लिलाव करण्यापूर्वी या कार्यालयास तसे लेखी सुचीत करावे.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात ४४०८ या लेखाशिर्षात जमा करावी.

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES OFFICE ...AI

सही/-

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) टेम्पो क्र. एमएच-०४-डीडी-८७३६ चा चालक, मोहमद इम्रान मोहमद वजीर

२) टेम्पो क्र. एमएच-०४-डीडी-८७३६ चा मालक

३) जप्त गहू साठयाचे मालक

(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, देवनार पोलिस स्टेशन, मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, देवनार पोलिस स्टेशन, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.

२) उपनियंत्रक शिधावाटप, ई परिमंडळ, वडाळा उयांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित.

३) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई. यांना माहितीसाठी अग्रेषित.

४) कार्यासन अधिकारी, दक्षता शाखा, क्र.क., प्रधान कार्यालय यांना माहितीकरीता.

~~५)~~ निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.